**प्रेसनोट दि. २२.०६.२०२१**

**श्री. हणमंत म्हेत्रे, अपर तहसिलदार संख ता. जत जि. सांगली व श्री. विशाल विष्णू उदगीरे वय ३७ वर्ष, तलाठी माडग्याळ अति.कार्यभार कोळगीरी यांनी २,३०,०००/- रुपये लाच स्विकारले बाबत कारवाई सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार हे त्यांचे वाहनामधून मातीवाहतूक करीत असताना त्यांची वाहने श्री. हणमंत म्हेत्रे, अपर तहसिलदार संख व श्री. उदगीरे तलाठी माडग्याळ यांनी अडवून कारवाई कामी अपरतहसीदार कार्यालय संख या ठिकाणी लावली होती. सदर वाहनांवर कारवाई न करण्याकरीता व वाहने सोडण्याकरीता श्री. हणमंत म्हेत्रे, अपर तहसिलदार संख व श्री. उदगीरे तलाठी माडग्याळ यांनी तक्रारदार यांचेकडे २,५०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि.०५.०६.२०२१ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक ०९.०६.२०२१ रोजी, दि.११.०६.२०२१ रोजी, दि.१६.०६.२०२१ रोजी तसेच आज दि.२२.०६.२०२१ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये तक्रारदार यांचे वाहनावर कारवाई न करण्याकरीता व वाहने सोडण्याकरीता यातील श्री. हणमंत म्हेत्रे, अपर तहसिलदार संख व श्री. उदगीरे तलाठी माडग्याळ यांनी तक्रारदार यांचेकडे २,५०,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि.२२.०६.२०२१ रोजी अपर तहसिलदार कार्यालय संख या ठिकाणी सापळा लावला असता श्री. हणमंत म्हेत्रे, अपर तहसिलदार संख ता. जत जि. सांगली व श्री. विशाल विष्णू उदगीरे वय ३७ वर्ष, तलाठी माडग्याळ अति.कार्यभार कोळगीरी यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून श्री. हणमंत म्हेत्रे, अपर तहसिलदार संख ता. जत जि. सांगली यांचे सांगणेवरून श्री. विशाल विष्णू उदगीरे वय ३७ वर्ष, तलाठी माडग्याळ अति.कार्यभार कोळगीरी यांनी तक्रारदार यांचेकडून २,३०,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले असून श्री. हणमंत म्हेत्रे, अपर तहसिलदार संख ता. जत जि. सांगली हे फरार आहेत.

त्या अनुषंगाने श्री. हणमंत म्हेत्रे, अपर तहसिलदार संख ता. जत जि. सांगली व श्री. विशाल विष्णू उदगीरे वय ३७ वर्ष, तलाठी माडग्याळ अति.कार्यभार कोळगीरी यांचे विरुध्द उमदी पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव श्री. अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे, सुहास नाडगौडा सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक,श्री. गुरूदत्त मोरे पोलीस निरीक्षक, श्री. प्रशांत चौगुले पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार अविनाश सागर, अजित पाटील, संजय संकपाळ, राधिका माने, संजय कलगुटगी, रविंद्र धुमाळ, सलीम मकानदार, प्रितम चौगुले, धनंजय खाडे, श्रीपती देशपांडे, भास्कर भोरे, सिमा माने, चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(Sujay Ghatge)
Dy. Supdt. of Police
Anti Corruption Bureau,Sangli

Scanned with CamScanner